Regd. No. MH323/2012

# Agro Inputs Manufacturers Association
(of india)

दि. २५.११.२०१३.

प्रति,
मा. कृषी आयुक्त साहेब
कृषी आयुक्तालय, मध्यवर्ती भवन
पुणे

**विषय - दुय्यम अन्नद्रव्ययुक्त खते, 'खत नियंत्रण कायदा १९८५' मध्ये समाविष्ट झाल्याबाबत**
**संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार -अ दि. ३१ ऑक्टोबर २०१३ चे नोटिफिकेशन**

महोदय,

सर्वप्रथम दुय्यम अन्नद्रव्ययुक्त खते 'खत नियंत्रण कायदा, १९८५' मध्ये समाविष्ट केल्याबद्दल 'ॲग्रो इनपुटस् मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन तर्फे आपले अभिनंदन व आभार आम्ही वरील निर्णयाचा आदर व स्वागत करतो.

परंतु वरील नोटिफिकेशन दि. ३१.१०.२०१३ रोजी आल्यानंतर सध्या बाजारात असणाऱ्या मालाच्या विक्रीवर सदर कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. बऱ्याच वितरकांनाही या खताची विक्री करू नये असे आदेश दिले जात आहेत त्याचप्रमाणे या खतास स्टॉपसेल दिला जात आहे.

सदर खते यापूर्वी कायद्याअंतर्गत येत नसल्यामुळे अनेक उत्पादकांच्या साठा विक्रेत्यांकडे विक्रीसाठी उपलब्ध आहे. सदर उत्पादने शेतकऱ्यांना रबी मौसमामध्ये उपयुक्त उत्पादने असल्यामुळे व त्याच्या विक्रीवर ताबडतोब निर्बंध घातल्यामुळे शेतकरी व उत्पादक अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सध्या रब्बी

लिपीक
आयुक्त कृषि यांचेकडे
कृषि आयुक्तालय, म. रा
पुणे - १
२५/११/१३

**Office Adderss :** Chhatrapati Shivaji Market Yard, Shop No.6, 1st Floor. Madhyavarti Bhavan, Gultekdi, Pune- 411037
Ph-020-24274482 Email- info@aimassociationindia.com. Website-www.aimassociationindia.com

मोसमातील पिकांना खते देण्यास सुरुवात झाली असून दुय्यम अन्नद्रव्ययुक्त खते ही पिकास अत्यंत आवश्यक असणारी खते आहेत. या खताच्या विक्रीस बंदी घातल्यास शेती उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता आम्ही आपणास विनंती करतो की, कृपया आपण सदर कायद्याच्या अंमलबजावणी करिता तसेच उत्पादकांना त्यांच्या परवान्यामध्ये वरील उत्पादन नोंद करण्यासाठी अथवा नवीन परवाना काढण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा व सध्या बाजारात उपलब्ध असणारा उत्पादकांच्या मालाचा साठा विकण्यास परवानगी द्यावी. यामुळे शेतकऱ्याचे व व्यावसायिकांचे नुकसान टळू शकेल.

वरील खते कायद्याच्या चौकटीमध्ये बसविण्या संदर्भात ॲग्रो इनपुटस् असोसिएशनने जी. आर. समिती च्या बैठकांमध्ये भरीव सूचना व काम केले असताना देखील कृषी खात्याकडून असोसिएशन ला याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. अन्यथा असोसिएशनमार्फत उत्पादकाना ह्याची वेळेवर माहिती देणे शक्य झाले असते.

वरील सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून कृपया आपण कायद्याच्या अंमलबजावणीकरिता उत्पादकाना पुरेसा वेळ द्यावा ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासु

AIM ASSOCIATION OF INDIA

President

C.C.TO. Director of Agricultural

C.C.T. Chief Quality control of Maha.